# प्रकरण पहिले
# लोकशाही

**प्रस्तावना :**

लोकशाही ही आजच्या जगात सर्वाधिक स्वीकारलेली शासन पद्धत आहे, जी लोकांना शासनाचे केंद्रबिंदू मानते. 'डेमोस' (लोक) आणि 'क्रॅटोस' (सत्ता) या ग्रीक शब्दांपासून बनलेला हा शब्द 'लोकांचे राज्य' दर्शवतो. अब्राहम लिंकन यांच्या सुप्रसिद्ध व्याख्येनुसार, ही प्रणाली "लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांकरवी चालवलेले राज्य" आहे, जिथे अंतिम सत्ता लोकांच्या हाती असते. लोकशाही केवळ राजकीय व्यवस्था नसून, सामाजिक व आर्थिक समानता प्रस्थापित करण्याचे एक साधन आहे. या प्रणालीमध्ये जनप्रतिनिधींचे शासन असते, जे सार्वत्रिक प्रौढ मताधिकार आणि मुक्त व निष्पक्ष निवडणुकांद्वारे निवडले जातात. कायद्याचे राज्य आणि मूलभूत अधिकार व स्वातंत्र्याचे संरक्षण ही तिची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. लोकशाहीचे स्वरूप देशागणिक बदलत जाते, ज्यामुळे कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळ यांच्या संबंधांवर आधारित संसदीय (Parliamentary) आणि अध्यक्षीय असे दोन प्रमुख प्रकार विकसित झाले आहेत. संसदीय लोकशाहीत (उदा. भारत) कार्यकारी मंडळ कायदेमंडळाला सामूहिकरित्या जबाबदार असते आणि पंतप्रधान हे वास्तव प्रमुख असतात, तर अध्यक्षीय लोकशाहीत (उदा. अमेरिका) अध्यक्ष हे थेट लोकांकडून निवडून आलेले, कायदेमंडळाला जबाबदार नसलेले वास्तव प्रमुख असतात.

**अ)अर्थ आणि व्याख्या**

लोकशाही म्हणजे 'लोकांचे राज्य'. हा शब्द ग्रीक भाषेतील 'डेमोस' (Demos - लोक) आणि 'क्रॅटोस' (Kratos - सत्ता/राज्य) या शब्दांपासून बनला आहे. याचा अर्थ, शासन करण्याची अंतिम सत्ता लोकांच्या हाती असते. लोकशाही हा केवळ शासनाचा प्रकार नाही, तर तो एक जीवनमूल्य आणि समाजातील समानता व न्यायावर आधारित कार्यप्रणाली आहे.

लोकशाहीची सर्वात प्रसिद्ध आणि स्वीकारार्ह व्याख्या अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी दिली आहे. "लोकांनी, लोकांसाठी, लोकांकरवी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही." (Government of the people, by the people, for the people.)

**१. अर्थ :**

लोकशाही म्हणजे 'लोकांचे राज्य'. ग्रीक भाषेतील 'डेमोस' (Demos - लोक) आणि 'क्रॅटोस' (Kratos - सत्ता/राज्य) या शब्दांवरून हे स्पष्ट होते की, शासनाची अंतिम सत्ता लोकांच्या हाती आहे. ही प्रणाली नागरिकांना त्यांच्या प्रतिनिधींना निवडण्याचा आणि त्यांना बदलण्याचा हक्क देते, ज्यामुळे शासन हे जबाबदार राहते.

लोकशाही केवळ निवडणुकीपुरती मर्यादित नसून, ती एक जीवनमूल्य आहे. याचा अर्थ, समाजात समानता, न्याय, स्वातंत्र्य आणि बंधुता ही मूल्ये रुजतात. लोकशाहीमध्ये कायद्यापुढे सर्व नागरिक समान मानले जातात. धर्म, जात, लिंग किंवा आर्थिक स्थिती यावर आधारित कोणताही भेदभाव मान्य नसतो. यामुळे समाजातील दुर्बळ आणि वंचित घटकांना समान संधी मिळतात आणि सामाजिक न्याय प्रस्थापित होतो. तसेच लोकांना निवडणुकीद्वारे शांततेच्या मार्गाने शासन बदलण्याचा अधिकार मिळतो. यामुळे क्रांती किंवा हिंसक बदलांची गरज कमी होते, ज्यामुळे राजकीय स्थिरता टिकून राहते. यार्कह बरोबर प्रत्येक व्यक्तीला मतदान करण्याचा, टीका करण्याचा आणि विचार मांडण्याचा हक्क मिळतो. यातून व्यक्तीचा सन्मान वाढतो आणि ती केवळ शासनाची प्रजा न राहता सक्रिय नागरिक बनते.

**२.लोकशाहीची व्याख्या**

**अब्राहम लिंकन** यांच्या व्याख्येशिवाय, लोकशाहीला वेगवेगळया दृष्टिकोनांतून परिभाषित करणाऱ्या काही प्रमुख व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

- **सीले :**

सीले यांच्या मते, "लोकशाही म्हणजे असे शासन, ज्यात प्रत्येक व्यक्तीचा शासनामध्ये सहभाग असतो." या व्याख्येमुळे लोकशाही केवळ निवडणुकीच्या दिवसापुरती मर्यादित न राहता 'समावेशक प्रणाली बनते.

- **प्रा. डायसी**

प्रा. डायसी 'बहुमताचे तत्त्व' स्पष्ट करतात. त्यांच्या व्याख्येनुसार, "लोकशाही म्हणजे जनतेच्या मोठ्या बहुसंख्येच्या नियमाखाली स्थापित झालेले शासन होय." ही व्याख्या लोकशाहीच्या निर्णय प्रक्रियेचा आधार स्पष्ट करते.

- **लॉर्ड ब्राइस**

लॉर्ड ब्राइस लोकशाहीतील सत्तेचा स्रोत स्पष्ट करतात. त्यांच्या मते, "लोकशाही हे असे शासन आहे, ज्यात शासनाची अंतिम सत्ता समाजातील एका विशिष्ट वर्गाऐवजी, सामान्यतः संपूर्ण समुदायाच्या सदस्यांमध्ये निहित असते."

या विविध व्याख्यांच्या माध्यमातून लोकशाही केवळ निवडणुकीच्या दिवसापुरती मर्यादित न राहता, समाजातील प्रत्येक नागरिकाला राजकीय प्रक्रियेत स्थान आणि महत्त्व देते, ज्यामुळे ती खऱ्या अर्थाने समावेशक प्रणाली ठरते. तसेच लोकशाहीत निर्णय हे बहुमताच्या तत्त्वावर आधारित असतात. हे तत्त्व राजकीय समानतेचे प्रतीक असले तरी, या बहुमताला अल्पसंख्याकांच्या हक्कांचा आदर करणे अपेक्षित असते. याच बरोबर शासनाचे सार्वभौमत्व कोणत्याही एका व्यक्तीकडे किंवा वर्गाकडे नसून, ते कायदेशीररित्या संपूर्ण जनतेकडे असते. हे समाजाला शासनावर अंतिम नियंत्रण ठेवण्याचा हक्क देते.

अशा प्रकारे लोकशाही ही केवळ शासनाची पद्धत नसून, सामाजिक समानता, न्याय आणि मानवी सन्मानावर आधारित एक जीवनमूल्य आणि कार्यप्रणाली आहे जी प्रत्येक नागरिकाला केवळ

मतदान करण्याचा नव्हे, तर शासनाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा आणि सत्तेचा अंतिम स्रोत बनण्याचा हक्क देते.

**ब) लोकशाहीची वैशिष्टये**

**१. जनप्रतिनिधींचे शासन :** प्रत्यक्ष लोकशाही मोठया आणि गुंतागुंतीच्या राष्ट्रांमध्ये शक्य नसल्यामुळे नागरिक निवडणुकीद्वारे आपले प्रतिनिधी निवडतात. हे प्रतिनिधी लोकांच्या वतीने कायदे बनवतात आणि शासन चालवतात. यामुळे सत्ता अप्रत्यक्षपणे लोकांच्या हाती राहते.

**२. सार्वभौमत्व :** लोकशाहीत सर्वोच्च सत्ता (अंतिम अधिकार) कोणत्याही राजाकडे किंवा विशिष्ट वर्गाकडे नसून, ती लोकांमध्ये किंवा लोकांच्या निवडलेल्या प्रतिनिधींमध्ये असते. यालाच जनतेचे सार्वभौमत्व म्हणतात, जे लोकशाही शासनाचा आधार आहे.

**३. मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका :** निवडणूका नियमित, दबावाशिवाय आणि न्यायपूर्ण (निष्पक्ष) वातावरणात होणे हे लोकशाहीचे प्राण आहे. यातून सत्ता परिवर्तनाची शक्यता जिवंत राहते आणि शासनाला लोकांच्या इच्छेनुसार कार्य करावे लागते.

**४. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार :** एका विशिष्ट वयावरील प्रत्येक नागरिकाला कोणताही भेदभाव न करता मतदान करण्याचा हक्क मिळतो. हे तत्त्व राजकीय समानतेचे प्रतीक आहे आणि शासनाला समाजातील प्रत्येक घटकासाठी जबाबदार बनवते.

**५. कायद्याचे राज्य :** यानुसार देशाचा कायदा सर्वोच्च असतो आणि शासन व नागरिक दोघेही कायद्याच्या चौकटीत काम करतात. याचा अर्थ कोणीही कायद्यापेक्षा मोठा नाही; अगदी पंतप्रधान किंवा राष्ट्राध्यक्षसुद्धा.

**६. समानता आणि न्याय :** धर्म, जात, लिंग किंवा आर्थिक स्थिती यावर आधारित कोणताही भेदभाव न करता, कायद्यापुढे सर्व नागरिक समान मानले जातात. हे वैशिष्ट्य सामाजिक व आर्थिक न्यायाचा आधार आहे.

**७. मूलभूत अधिकार आणि स्वातंत्र्य :** लोकशाहीत नागरिकांना विचार, अभिव्यक्ती, संघटन, धर्म आणि शांततापूर्ण आंदोलन यासारख्या अनेक मूलभूत हक्कांची घटनात्मक हमी दिली जाते. ह व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे.

**८. बहुमताचे राज्य, अल्पसंख्याकांचे संरक्षण :** निर्णय बहुमताच्या आधारावर घेतले जातात, कारण हीच जनमताची अभिव्यक्ती असते. मात्र, त्याच वेळी अल्पसंख्याक समुदायाचे हक्क आणि हितसंबंध जपले जाणे हे शासनावर बंधनकारक असते.

**९. न्यायपालिकेचे स्वातंत्र्य :** न्यायपालिका शासनाच्या इतर दोन अंगांच्या कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळ हस्तक्षेपाशिवाय स्वतंत्रपणे कार्य करते. न्यायपालिका नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षक आणि घटनेचे अर्थनिर्वचन म्हणून काम करते.

**१०. विरोधी पक्षाचे स्वातंत्र्य :** लोकशाहीत विरोधी पक्षाला सत्ताधारी पक्षावर टीका करण्याचे, पर्याय सादर करण्याचे आणि आपले विचार मुक्तपणे मांडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. यामुळे शासन निरंकुश बनत नाही.

**११. जबाबदार शासन :** शासन हे लोकांना आणि त्यांच्या प्रतिनिधींना (कायदेमंडळाला) आपल्या प्रत्येक कृतीबद्दल आणि धोरणांबद्दल स्पष्टीकरण देण्यासाठी जबाबदार असते. नागरिकांना प्रश्न विचारण्याचा हक्क असतो.

**१२. सामूहिक जबाबदारी :** (विशेषतः संसदीय प्रणालीत) कार्यकारी मंडळातील सर्व मंत्री एकाच बाजूने बोलतात आणि एका निर्णयासाठी सामूहिकरित्या कायदेमंडळाला जबाबदार असतात. यामुळे मंत्रिमंडळात एकता टिकून राहते.

**१३. पारदर्शकता :** शासनाच्या कामकाजामध्ये स्पष्टता आणि खुलेपणा राखला जातो. माहितीचा अधिकार यासारख्या साधनांमुळे नागरिकांना शासनाच्या धोरणांची व निर्णयांची माहिती मिळू शकते, ज्यामुळे भ्रष्टाचार कमी होतो.

**१४. विकेंद्रीकरण :** सत्तेचे केंद्रीकरण टाळण्यासाठी, निर्णय घेण्याचे अधिकार स्थानिक स्तरापर्यंत (उदा. ग्रामपंचायती, नगरपालिका) विभागले जातात. यामुळे स्थानिक गरजांनुसार निर्णय घेता येतात आणि लोकसहभाग वाढतो.

**१५. सहिष्णुता आणि समन्वय :** लोकशाहीत विविध मते आणि मतभेद स्वीकारण्याची सहिष्णुता आवश्यक असते. सार्वजनिक हितासाठी वेगवेगळ्या विचारधारेतील पक्षांना संवाद साधून आणि समन्वय (मध्य साधणे) करून पुढे जावे लागते.

**क) संसदीय लोकशाही आणि अध्यक्षीय लोकशाही**

आधुनिक लोकशाही शासनप्रणालींचे दोन प्रमुख आणि सर्वाधिक प्रचलित प्रकार म्हणजे संसदीय लोकशाही आणि अध्यक्षीय लोकशाही होय. जरी या दोन्ही प्रणाली नागरिकांच्या सार्वभौमत्वावर आणि निवडणुकीच्या तत्त्वांवर आधारित असल्या तरी, त्यांचे मूळ स्वरूप आणि शासनाचे कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळ यांच्यातील संबंध यांमध्ये मोठा फरक आहे.

लोकशाहीचा उदय झाल्यानंतर, विशेषत: ब्रिटनमध्ये संसदीय प्रणाली विकसित झाली, जिथे कार्यकारी मंडळ थेट कायदेमंडळाला जबाबदार असते. याउलट, अमेरिकेत अधिकार पृथक्करणाच्या तत्त्वावर आधारित अध्यक्षीय प्रणाली विकसित झाली, जिथे कार्यकारी प्रमुख (अध्यक्ष) थेट लोकांमधून निवडला जातो आणि तो कायदेमंडळाला जबाबदार नसतो.

**❖ संसदीय लोकशाही :**

संसदीय लोकशाही ही जगातील अनेक प्रमुख देशांनी (उदा. भारत, युनायटेड किंगडम, कॅनडा) स्वीकारलेली एक अत्यंत महत्त्वाची शासनप्रणाली आहे. या प्रणालीचे केंद्रस्थान कायदेमंडळ असते, ज्यातून कार्यकारी मंडळ निर्माण होते.

संसदीय लोकशाहीचा मूळ गाभा म्हणजे कार्यकारी मंडळाचे कायदेमंडळाला असलेले उत्तरदायित्व होय. या प्रणालीला 'जबाबदार शासन' म्हणतात कारण मंत्रिमंडळ (कार्यकारी मंडळ) आपल्या प्रत्येक कृतीसाठी आणि धोरणांसाठी संसदेला (कायदेमंडळ) सामूहिकरित्या जबाबदार

असते. जर मंत्रिमंडळाने कायदेमंडळाचा (उदा. लोकसभेचा) विश्वास गमावला, तर अविश्वास प्रस्तावा द्वारे ते मुदतीपूर्वी बरखास्त होऊ शकते.

**१.द्वैत कार्यकारी मंडळ :**

संसदीय प्रणालीचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे दोन कार्यकारी प्रमुख असणे.

- **वास्तव कार्यकारी प्रमुख** : पंतप्रधान हे वास्तविक कार्यकारी प्रमुख असतात. ते मंत्रिमंडळाचे नेतृत्व करतात, प्रमुख निर्णय घेतात आणि शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी करतात.
- **नाममात्र/घटनात्मक प्रमुख :** राष्ट्राध्यक्ष (प्रजासत्ताकात) किंवा राजा/राणी (राजेशाहीत) हे केवळ घटनात्मक प्रमुख असतात. त्यांचे अधिकार औपचारिकता आणि समारंभापुरते मर्यादित असतात. ते पंतप्रधानांच्या सल्ल्यानेच कार्य करतात.

**२.कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळात समन्वय :**

संसदीय प्रणालीत कार्यकारी मंडळ कायदेमंडळातून निवडले जाते आणि त्याचे सदस्य कायदेमंडळाचे सदस्य असतात. यामुळे दोन प्रमुख शासकीय अंगांमध्ये विरोध कमी असतो आणि घनिष्ठ समन्वय साधला जातो.

- सदस्यत्व: कार्यकारी मंडळातील (मंत्रिमंडळ) प्रत्येक व्यक्तीला संसदेच्या (कायदेमंडळाच्या) कोणत्याही एका सभागृहाचा सदस्य असणे अनिवार्य असते.
- वेस्टमिन्स्टर मॉडेल: ही प्रणाली ज्या पद्धतीने ब्रिटनच्या वेस्टमिन्स्टर पॅलेसमधून विकसित झाली त्यावरून तिला 'वेस्टमिन्स्टर मॉडेल' असेही म्हटले जाते.

**३.पंतप्रधानांचे नेतृत्व :**

पंतप्रधान हे संसदीय प्रणालीचे सर्वात शक्तिशाली आणि सर्वांत महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व असतात.

- मंत्रिमंडळाचे प्रमुख असतात.
- संबंधित सभागृहातील सत्ताधारी पक्षाचे नेते असतात.
- शासनाचे धोरणात्मक निर्णय घेण्यात त्यांची भूमिका निर्णायक असते.

**४.कायदेमंडळाचे विसर्जन :**

संसदीय प्रणालीत, वास्तविक प्रमुख (पंतप्रधान) नाममात्र प्रमुखांना (राष्ट्राध्यक्ष/राजा) कनिष्ठ सभागृह (उदा. लोकसभा) मुदतीपूर्वी विसर्जित करण्याचा आणि नवीन निवडणुका घेण्याचा सल्ला देऊ शकतात. यामुळे शासनामध्ये एक प्रकारची लवचिकता कायम राहते. संसदीय लोकशाही ही लवचिक असली तरी, कधीकधी अस्थिरता निर्माण करू शकते (उदा. त्रिशंकू संसद झाल्यास). मात्र, ती जबाबदार शासन असल्याने नागरिकांना उत्कृष्ट उत्तरदायित्वाची हमी देते.

- **संसदीय लोकशाहीचे प्रकार :**

संसदीय लोकशाहीचे प्रामुख्याने दोन प्रकार आढळतात, जे देशाच्या प्रमुख पदावर अवलंबून असतात

**अ)संसदीय प्रजासत्ताक :**

या प्रकारात देशाचा प्रमुख निवडून आलेला असतो आणि त्याला राष्ट्राध्यक्ष म्हणतात. राष्ट्राध्यक्ष हे नाममात्र प्रमुख असतात आणि त्यांच्याकडे कोणतेही वास्तविक कार्यकारी अधिकार नसतात. उदाहरण: भारत, जर्मनी, इटली.

**ब) संसदीय राजेशाही :**

या प्रकारात देशाचा प्रमुख हा वंशपरंपरागत राजा किंवा राणी असतो. त्यांचे स्थान केवळ औपचारिक असते आणि ते घटनेनुसार वागतात. देशाचे वास्तविक शासन पंतप्रधान चालवतात. उदाहरण: युनायटेड किंगडम (यूके), जपान, स्वीडन, कॅनडा.

- **संसदीय लोकशाहीची प्रमुख वैशिष्टये:**

संसदीय लोकशाही, ज्याला 'जबाबदार शासन' किंवा 'वेस्टमिन्स्टर मॉडेल' असेही म्हणतात, हे कार्यकारी मंडळ (मंत्रिमंडळ) आणि कायदेमंडळ (संसद) यांच्यातील घनिष्ठ संबंधांवर आधारित आहे.

**१. दोन कार्यकारी प्रमुख :**

या व्यवस्थेत शासनाचे दोन कार्यकारी प्रमुख असतात. नाममात्र प्रमुख म्हणजे राष्ट्रपती (प्रजासत्ताकात) किंवा राजा/राणी (राजेशाहीत), हे केवळ घटनात्मक प्रमुख असतात आणि त्यांच्या नावावर सर्व शासकीय कार्ये चालतात. याउलट, वास्तव प्रमुख म्हणजे पंतप्रधान, हे मंत्रिमंडळाचे नेतृत्व करतात आणि प्रत्यक्षात सर्व निर्णय घेतात. सत्ता नाममात्र प्रमुखांच्या नावाने असली तरी तिचा वापर पंतप्रधानांकडून केला जातो.

**२. कायदेमंडळ आणि कार्यकारिणीत समन्वय :**

संसदीय प्रणालीतील हे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. कार्यकारी मंडळ (मंत्रिमंडळ) हे कायदेमंडळाचाच (संसदेचा) भाग असते. मंत्री हे कायदेमंडळातून निवडले जातात आणि त्यांच्यातील सदस्यत्व दोन्ही अंगांना जोडते. यामुळे शासनाचे धोरण ठरवताना आणि त्याची अंमलबजावणी करताना कार्यकारी आणि कायदेमंडळात घनिष्ठ संबंध आणि समन्वय साधला जातो.

**३. सामूहिक जबाबदारी :**

सामूहिक जबाबदारी हे संसदीय शासनाचे हृदय मानले जाते. यानुसार, मंत्रिमंडळाचे सर्व सदस्य (मंत्री) आपल्या सर्व कार्यांसाठी आणि धोरणांसाठी कायदेमंडळाला (संसद) सामूहिकरित्या जबाबदार असतात. याचा अर्थ, एखादा निर्णय जरी एका मंत्र्याने घेतला असला तरी संपूर्ण मंत्रिमंडळ त्या निर्णयासाठी जबाबदार असते. मंत्रिमंडळाने एका संघासारखे काम करणे अपेक्षित असते.

**४. राजकीय एकरूपता :**

सामान्यतः, कार्यकारी मंडळाचे (मंत्रिमंडळ) सदस्य एकाच राजकीय पक्षाचे किंवा समान विचारसरणीच्या पक्षांच्या युतीचे असतात. त्यामुळे शासनाच्या धोरणांमध्ये आणि कार्यक्रमांमध्ये एकवाक्यता आणि सुसंगतता राखली जाते, ज्यामुळे शासन कार्यक्षमतेने चालते.

**५. पंतप्रधानांचे नेतृत्व :**

पंतप्रधान हे संसदीय प्रणालीतील सर्वाधिक शक्तिशाली पद असते. ते केवळ मंत्रिमंडळाचेच नव्हे, तर संसदेतील सत्ताधारी पक्षाचेही नेते असतात. धोरण निश्चिती, मंत्रिमंडळाची निर्मिती आणि शासनाच्या कार्याचे दिशादर्शन करण्यात त्यांची भूमिका केंद्रीय असते.

**६. गोपनीयता :**

शासनाच्या धोरणांवर मंत्रिमंडळात जी चर्चा होते आणि जे निर्णय घेतले जातात, ते जनतेसमोर येण्यापूर्वी गोपनीय ठेवले जातात. मंत्र्यांना आपले कार्यभार स्वीकारताना या गोपनीयतेची शपथ घ्यावी लागते. हे देशाच्या राष्ट्रीय हितासाठी आणि धोरणांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी महत्त्वाचे असते.

**७. सदस्यत्व अनिवार्य :**

कार्यकारी मंडळाच्या (मंत्रिमंडळाच्या) सदस्यांना कायद्यानुसार कायदेमंडळाचे सदस्य असणे अनिवार्य असते. जर एखादी व्यक्ती मंत्री म्हणून नियुक्त झाली, परंतु ती कायदेमंडळाची सदस्य नसेल, तर तिला विशिष्ट मुदतीत (उदा. सहा महिन्यांत) निवडणुकीद्वारे निवडून येणे आवश्यक असते. हे वैशिष्ट्य कार्यकारी मंडळाचे कायदेमंडळावरील अवलंबित्व दर्शवते.

**८. कायदेमंडळाचे विसर्जन :**

संसदीय लोकशाहीत, वास्तविक प्रमुख (पंतप्रधान) हे नाममात्र प्रमुखांना (राष्ट्राध्यक्ष) कायदेमंडळाच्या कनिष्ठ गृहाला (उदा. लोकसभेला) मुदतीपूर्वी विसर्जित करण्याचा सल्ला देऊ शकतात. नाममात्र प्रमुख सामान्यतः पंतप्रधानांचा हा सल्ला मानतात. यामुळे नवीन निवडणुका घेऊन लोकांना शासनाबद्दल आपला पुन्हा कौल देण्याची संधी मिळते, ज्यामुळे प्रणालीमध्ये लवचिकता टिकून राहते.

**❖ अध्यक्ष शासन पद्धतीने :**

अध्यक्षीय शासन पद्धती म्हणजे अशी व्यवस्था, जिथे कार्यकारी प्रमुख हा राष्ट्राध्यक्ष असतो आणि तो कायदेमंडळाला जबाबदार नसतो. ही प्रणाली अधिकार पृथक्करणाच्या तत्त्वावर आधारित आहे,

जिथे कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळ एकमेकांपासून स्वतंत्रपणे कार्य करतात. अमेरिकेची संयुक्त संस्थाने हे या शासन पद्धतीचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

**अर्थ :**

अध्यक्षीय शासन पद्धती आहे जिथे राष्ट्राध्यक्ष हा वास्तव आणि नाममात्र दोन्ही प्रकारचा प्रमुख असतो. तो थेट लोकांकडून निवडला जातो आणि आपल्या मंत्रिमंडळाच्या मदतीने शासन चालवतो. या प्रणालीचे मूळ अधिकार पृथक्करण हे आहे. कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळ हे एकमेकांना नियंत्रित करतात, परंतु एकमेकांच्या कामात हस्तक्षेप करत नाहीत. त्यामुळे, राष्ट्राध्यक्ष कायद्याच्या अंमलबजावणीसाठी कायदेमंडळाला जबाबदार नसतात.

**अध्यक्षीय शासन पद्धतीचे प्रकार**

अध्यक्षीय प्रणाली मुख्यतः एकाच मूलभूत संरचनेवर आधारित असली तरी, अंमलबजावणी आणि सत्तेच्या वाटपानुसार काही भिन्नता आढळतात.

**अ) शुद्ध अध्यक्षीय प्रणाली**

ही प्रणाली अमेरिकेच्या मॉडेलवर आधारित आहे. येथे राष्ट्राध्यक्ष हे कार्यकारी मंडळाचे एकमेव प्रमुख असतात आणि त्यांची निवड कायदेमंडळापासून पूर्णपणे स्वतंत्र असते. राष्ट्राध्यक्ष आणि त्यांचे मंत्रिमंडळ हे कायदेमंडळाचे सदस्य नसतात.

- उदाहरण: युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (USA)

**ब) अर्ध-अध्यक्षीय प्रणाली**

याला कधीकधी अध्यक्षीय-संसदीय प्रणाली असेही म्हणतात. यात राष्ट्राध्यक्ष आणि पंतप्रधान दोघेही महत्त्वाचे कार्यकारी प्रमुख असतात.

- राष्ट्राध्यक्ष थेट लोकांकडून निवडले जातात आणि त्यांच्याकडे वास्तविक अधिकार असतात (विशेषतः परराष्ट्र धोरणात).
- पंतप्रधान हे कायदेमंडळातून निवडले जातात आणि ते कायदेमंडळाला जबाबदार असतात.

- उदाहरण: फ्रान्स, रशिया, श्रीलंका.

**अध्यक्षीय शासन पद्धतीची वैशिष्ट्ये**

**१. एकच कार्यकारी प्रमुख :** अध्यक्षीय प्रणालीतील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे राष्ट्राध्यक्ष हेच वास्तव कार्यकारी प्रमुख आणि नाममात्र प्रमुख दोन्ही असतात. संसदीय प्रणालीप्रमाणे (उदा. भारत), येथे अधिकार दुहेरी नसतात (म्हणजे पंतप्रधान आणि राष्ट्रपती असे विभाजन नसते). राष्ट्राध्यक्ष हेच राज्याचे प्रमुख आणि शासनाचे प्रमुख असतात, ज्यामुळे निर्णय प्रक्रियेत एकरूपता आणि वेग येतो.

**२. निश्चित कार्यकाळ :** राष्ट्राध्यक्षांचा कार्यकाळ निश्चित असतो (उदा. अमेरिकेत ४ वर्षे). सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ते कायदेमंडळाचा विश्वास गमावल्यामुळे बरखास्त होऊ शकत नाहीत. राष्ट्राध्यक्षांना त्यांच्या पदावरून काढणे अत्यंत कठीण असते; केवळ गंभीर घटनात्मक उल्लंघनासाठी त्यांना महाभियोगाद्वारे काढले जाऊ शकते. हा निश्चित कार्यकाळ धोरणांमध्ये स्थिरता आणतो.

**३. अधिकार पृथक्करण :** अध्यक्षीय प्रणाली अधिकार पृथक्करणाच्या तत्त्वावर आधारित आहे. कार्यकारी मंडळ (राष्ट्राध्यक्ष आणि त्यांचे कॅबिनेट) आणि कायदेमंडळ (उदा. अमेरिकेतील काँग्रेस) हे स्वतंत्रपणे कार्य करतात. राष्ट्राध्यक्ष हे कायदेमंडळाचे सदस्य नसतात आणि ते त्यांच्या अधिवेशनांना उपस्थित राहत नाहीत. या विभाजनामुळे शासनाच्या कोणत्याही एका शाखेकडे अमर्याद सत्ता केंद्रित होत नाही, ज्यामुळे शासनाचे संतुलन राखले जाते.

**४. अजबाबदार शासन :** कार्यकारी मंडळ (राष्ट्राध्यक्ष आणि त्यांचे कॅबिनेट) हे आपल्या धोरणांसाठी आणि कृतींसाठी कायदेमंडळाला जबाबदार नसते. संसदीय प्रणालीमध्ये जसे कार्यकारी मंडळ (मंत्रिमंडळ) कायदेमंडळाच्या विश्वासावर अवलंबून असते, तसे अध्यक्षीय प्रणालीत नसते. त्यामुळे कायदेमंडळ अविश्वास ठरावाद्वारे राष्ट्राध्यक्षांना किंवा त्यांच्या कॅबिनेटला काढू शकत नाही. यामुळे शासनामध्ये तात्काळ उत्तरदायित्वाची कमतरता जाणवते.

**५. मंत्रिमंडळाची निवड :** राष्ट्राध्यक्ष त्यांच्या मंत्रिमंडळातील सदस्यांची निवड स्वतःच्या इच्छेनुसार करतात. मंत्रिमंडळातील सदस्य निवडताना, राष्ट्राध्यक्ष अनेकदा विशिष्ट विषयातील तज्ज्ञ किंवा गैर-

राजकारणी व्यक्तींची निवड करू शकतात. हे कॅबिनेट सदस्य कायदेमंडळाचे सदस्य नसतात (असल्यास त्यांना राजीनामा द्यावा लागतो). यामुळे राष्ट्राध्यक्षांना त्यांच्या कार्यासाठी योग्य आणि विश्वासू व्यक्ती निवडण्याचे स्वातंत्र्य मिळते.

**६. धोरणांमध्ये सातत्य :** राष्ट्राध्यक्षांचा कार्यकाळ निश्चित असल्यामुळे आणि ते राजकीय अस्थिरतेमुळे काढले जाऊ शकत नसल्यामुळे, ते आपल्या धोरणांची सातत्याने अंमलबजावणी करू शकतात. दीर्घकालीन धोरणांना यशस्वी करण्यासाठी ही स्थिरता अत्यंत महत्त्वाची आहे, ज्यामुळे प्रशासकीय कामकाजात स्थिरता येते.

अध्यक्षीय प्रणाली स्थिर आणि दृढनिश्चयी असली तरी, ती संसदीय प्रणालीइतकी लवचिक आणि कायदेमंडळाला जबाबदार नसते. ही प्रणाली विशेषतः वेगवान निर्णय आणि दीर्घकालीन योजना राबवण्यासाठी प्रभावी मानली जाते.

---

अ) बहुपर्यायी रिकाम्या जागा भरा

1. 'लोकशाही' (Democracy) हा शब्द ग्रीक भाषेतील 'डेमोस' (Demos - लोक) आणि ____________ या शब्दांपासून बनला आहे.

    अ) क्रिटॉस

    ब) क्रॅटोस

    क) थेऑस

    ड) मॉनॉस

2. "लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांकरवी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही" ही प्रसिद्ध व्याख्या ____________ यांनी दिली आहे.

    अ) सीले

    ब) लॉर्ड ब्राइस

क) अब्राहम लिंकन

ड) प्रा. डायसी

3. ____________ या तत्त्वानुसार लोकशाहीतील निर्णय हे बहुमताच्या आधारावर घेतले जातात, परंतु अल्पसंख्याकांच्या हक्कांचा आदर करणे अपेक्षित असते.

अ) सार्वभौमत्वाचे तत्त्व

ब) कायद्याचे राज्य

क) बहुमताचे तत्त्व

ड) सहिष्णुतेचे तत्त्व

4. लोकशाहीचे कोणते वैशिष्ट्य शासनाला नागरिकांच्या इच्छेनुसार कार्य करण्यास बाध्य करते आणि सत्ता परिवर्तनाची शक्यता जिवंत ठेवते?

अ) कायद्याचे राज्य

ब) मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका

क) न्यायपालिकेचे स्वातंत्र्य

ड) सामूहिक जबाबदारी

5. संसदीय लोकशाहीमध्ये कार्यकारी मंडळ (मंत्रिमंडळ) आपल्या कृतींसाठी ____________ ला सामूहिकरित्या जबाबदार असते.

अ) राष्ट्राध्यक्षांना

ब) न्यायपालिकेला

क) कायदेमंडळाला (संसद)

ड) विरोधी पक्षाला

6. संसदीय लोकशाहीमध्ये ____________ हे वास्तव कार्यकारी प्रमुख असतात.

- अ) राष्ट्राध्यक्ष

- ब) राजा/राणी
- क) सरन्यायाधीश
- ड) पंतप्रधान

7. अध्यक्षीय लोकशाही (उदा. अमेरिका) मध्ये राष्ट्राध्यक्षांचा कार्यकाळ ____________ असतो.

    अ) अस्थिर

    ब) लवचिक

    क) निश्चित

    ड) कायद्यावर अवलंबून

8. सत्तेचे केंद्रीकरण टाळण्यासाठी आणि लोकसहभाग वाढवण्यासाठी अधिकार स्थानिक स्तरांपर्यंत विभागले जातात, या वैशिष्ट्याला ____________ म्हणतात.

    अ) राजकीय एकरूपता

    ब) सामूहिक जबाबदारी

    क) विकेंद्रीकरण

    ड) वेस्टमिन्स्टर मॉडेल

9. ____________ या व्याख्येमुळे लोकशाही केवळ निवडणुकीच्या दिवसापुरती मर्यादित न राहता 'समावेशक प्रणाली' बनते.

    अ) प्रा. डायसी

    ब) लॉर्ड ब्राइस

    क) अब्राहम लिंकन

    ड) सीले

10.अध्यक्षीय शासन पद्धतीचे मूळ तत्त्व ____________ हे आहे, जिथे कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळ एकमेकांपासून स्वतंत्रपणे कार्य करतात.

अ) सामूहिक जबाबदारी

◦ ब) अधिकार पृथक्करण

क) मंत्रिमंडळाचे नेतृत्व

ड) वेस्टमिन्स्टर मॉडेल

उत्तरे ; **ब) क्रॅटोस**

क) अब्राहम लिंकन

क) बहुमताचे तत्त्व

ब) मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका

क) कायदेमंडळाला (संसद)

ड) पंतप्रधान

क) निश्चित

क) विकेंद्रीकरण

ड) सीले

ब) टिपा लिहा

१. संसदीय लोकशाहीचे सामूहिक जबाबदारीचे तत्त्व

२. लोकशाहीचे जीवनमूल्य आणि सामाजिक न्याय

३. अध्यक्षीय शासन पद्धतीतील एकच कार्यकारी प्रमुख

४. लोकशाहीचे सार्वत्रिक प्रौढ मताधिकार आणि समानता

५. संसदीय प्रजासत्ताक आणि संसदीय राजेशाही यातील फरक

क) दीर्घोत्तरी प्रश्न

१.'लोकशाही' या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करून, लोकशाहीची वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

२.संसदीय लोकशाहीची (उदा. भारत) व्याख्या, वैशिष्ट्ये आणि प्रकार स्पष्ट करा.

३.संसदीय लोकशाही आणि अध्यक्षीय लोकशाही (उदा. अमेरिका) या दोन प्रणालींमधील संबंधांच्या आधारावर मुख्य फरक स्पष्ट करा.

**राजकीय संकल्पना अर्थ, स्वरूप आणि प्रकार**

**अ. अधिकार**

**ब.स्वातंत्र्य**

**क.समानता**

**ड.न्याय**

## प्रकरण दुसरे

## राजकीय संकल्पना अर्थ, स्वरूप आणि प्रकार

**प्रस्तावना :**

राजकीय तत्त्वज्ञानाचा आणि शासनव्यवस्थेचा पायाभूत आधार असलेल्या अधिकार, स्वातंत्र्य, समानता आणि न्याय या संकल्पना कोणत्याही आधुनिक राष्ट्राच्या लोकशाही आणि नैतिक मूल्यांसाठी मध्यवर्ती ठरतात. या संकल्पना केवळ तात्त्विक चर्चांचे विषय नसून, त्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर, त्यांच्या हक्कांवर आणि त्यांच्या सामाजिक-राजकीय सहभागावर थेट परिणाम करतात.

या चारही संकल्पना परस्पर-संबंधित आणि परस्परपूरक आहेत. उदाहरणार्थ, स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठी समानता आवश्यक असते आणि या दोघांचे संरक्षण करण्यासाठी न्याय ही अंतिम कसोटी ठरते. या सर्व संकल्पनांना 'अधिकार' (Rights) हे संविधानात्मक आणि कायदेशीर स्वरूप प्रदान करतात, ज्यामुळे नागरिकांना शासनव्यवस्थेविरुद्ध आणि इतरांविरुद्ध त्यांचे हक्क मिळवण्याची कायदेशीर हमी मिळते.

या राजकीय संकल्पनांचा अभ्यास करताना, त्यांचा अर्थ केवळ शब्दकोशातील व्याख्येपुरता मर्यादित नसतो, तर त्यांचे स्वरूप हे बदलत्या सामाजिक गरजांनुसार आणि ऐतिहासिक बदलांनुसार गतिमान असते. त्यांचे विविध प्रकार (उदा. नैसर्गिक अधिकार, नागरी स्वातंत्र्य, सामाजिक समानता, आर्थिक न्याय) समजून घेतल्यास, कोणत्याही शासनप्रणालीचे वास्तविक मूल्यांकन करणे शक्य होते. थोडक्यात, लोककल्याणकारी राज्य आणि न्यायपूर्ण समाजव्यवस्था प्रस्थापित करण्याच्या दृष्टिकोनातून या चारही संकल्पनांचा सखोल अभ्यास करणे अपरिहार्य आहे.

**अ)अधिकार :**

अधिकार ही संकल्पना व्यक्तीच्या स्वाभिमान आणि सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेले संरक्षण आणि संधी दर्शवते. केवळ भौतिक अस्तित्वच नव्हे, तर बौद्धिक, नैतिक आणि सामाजिक विकास सुनिश्चित करण्यासाठी अधिकार अपरिहार्य आहेत.

**१. अर्थ आणि कायदेशीर स्वरूप**

अधिकार हे व्यक्तीचे समाजाकडून आणि राज्याकडून असलेले न्याय्य दावे आहेत.

- **राज्याची भूमिका:** अधिकारांना केवळ नैतिक स्वीकृती नव्हे, तर कायदेशीर संरक्षण मिळाल्यासच ते प्रभावी ठरतात. राज्याने या अधिकारांना कायद्याची शक्ती देऊन त्यांची अंमलबजावणी करणे हे आधुनिक लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे. या कायदेशीर संरक्षणाशिवाय, अधिकार केवळ इच्छा राहतात.
- **सार्वजनिक हित :** अधिकार कधीही अमर्याद नसतात. त्यांचा वापर नेहमी इतरांचे हक्क आणि सार्वजनिक हित लक्षात घेऊन केला जातो. उदाहरणार्थ, भाषण स्वातंत्र्याचा अर्थ कोणाचीही बदनामी करण्याचा अधिकार नाही. अधिकार आणि कायद्याची **चौकट** एकमेकांना पूरक असतात.

**२. जबाबदारीचे सहसंबंध**

अधिकार आणि जबाबदारी हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

- **अधिकार उपभोगणे:** व्यक्तीला जेव्हा स्वातंत्र्य आणि जीवन जगण्याचा अधिकार मिळतो, तेव्हा त्या बदल्यात तिला कायद्याचे पालन करणे आणि कर भरणे यांसारख्या जबाबदाऱ्या पूर्ण कराव्या लागतात.

- **प्रशासकीय दृष्टिकोन:** लोकप्रशासनात, नागरिकांना सेवा मिळण्याचा अधिकार आहे, तर प्रशासकीय अधिकाऱ्यांवर त्या सेवा प्रामाणिकपणे आणि कार्यक्षमतेने पुरवण्याची जबाबदारी आहे.

**३. अधिकारांचे प्रकार :**

- **नैसर्गिक अधिकार**

जॉन लॉक यांसारख्या विचारवंतांनी हे अधिकार ईश्वरी किंवा निसर्गाने दिलेले मानले आहेत. याचा अर्थ हे अधिकार राज्याच्या स्थापनेपूर्वीपासून अस्तित्वात होते आणि ते राज्याच्या इच्छेवर अवलंबून नाहीत. हे अधिकार (उदा. जीवन, स्वातंत्र्य, मालमत्ता) अहिरावण्याजोगे मानले जातात, परंतु आधुनिक काळात नैसर्गिक अधिकारांची संकल्पना कायदेशीर अधिकारांमध्ये समाविष्ट झाली आहे.

- **कायदेशीर अधिकार**

राज्याच्या कायद्याद्वारे स्थापित केलेले हे अधिकार सर्वात प्रभावी असतात.

- **नागरी अधिकार :** व्यक्तीचे दैनंदिन जीवन सुकर करण्यासाठी आवश्यक (उदा. सन्मानाने जगणे, मालमत्ता धारण करणे, कराराचे स्वातंत्र्य). हे अधिकार शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक आहेत.
- **राजकीय अधिकार :** लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करतात (उदा. मतदानाचा अधिकार, सार्वजनिक पदे भूषवण्याचा अधिकार). या अधिकारांमुळे शासनाचे स्वरूप लोकशाही आणि उत्तरदायी राहते.
- **सामाजिक/आर्थिक अधिकार :** व्यक्तीला केवळ राजकीय स्वातंत्र्य पुरेसे नाही, तर तिला मानवी जीवन जगण्यासाठी कामाचा अधिकार, योग्य वेतन, सामाजिक सुरक्षा यांसारख्या आर्थिक संधी मिळणे आवश्यक आहे. हे अधिकार कल्याणकारी राज्यासाठी महत्त्वाचे आहेत.

- **मूलभूत अधिकार :**

हे कायदेशीर अधिकारांपेक्षा वरिष्ठ असतात, कारण ते थेट संविधानात समाविष्ट केलेले आहेत. राज्याला हे अधिकार सहजपणे हिरावून घेता येत नाहीत आणि यांच्या संरक्षणाची हमी थेट न्यायपालिका देते. (उदा. भारतीय संविधानातील समतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार). मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झाल्यास नागरिक थेट उच्च न्यायालयात किंवा सर्वोच्च न्यायालयात दाद मागू शकतात.

**ब) स्वातंत्र्य :**

स्वातंत्र्य ही राजकीय संकल्पना फ्रेंच भाषेतील 'La Liberté' या शब्दातून आली आहे, ज्याचा मूळ अर्थ 'मुक्ती' असा आहे. प्राथमिक पातळीवर, स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीवर कोणत्याही प्रकारचे बंधनाचा अभाव असे मानले जात असले तरी, ही कल्पना अपूर्ण आहे. मनुष्य हा समाजाचा घटक असल्याने, समाजस्वास्थ्य आणि शांतता टिकवण्यासाठी व्यक्तीवर विवेकपूर्ण बंधने असणे आवश्यक आहे. त्यामुळे, स्वातंत्र्य हा स्वैराचार नसून कायद्याच्या चौकटीत राहून उपभोगता येणारा अधिकार आहे. राज्याचे कायदे व्यक्तीच्या हक्कांचे आणि सुरक्षिततेचे रक्षण करण्यासाठी बंधने घालतात, ज्यामुळे व्यक्तीचे स्वातंत्र्य कमी न होता निश्चित आणि सुरक्षित होते. विविध विचारवंतांनी या संकल्पनेची सखोल मांडणी केली आहे. व्यक्तिवादी विचारवंतांनुसार इतरांच्या स्वातंत्र्यावर आक्रमण न करता आपल्या इच्छेप्रमाणे वागणे म्हणजे स्वातंत्र्य होय. तर ग्रीन आणि कांट या आदर्शवादी विचारवंतांच्या मते, नैतिक चेतना आणि इच्छेनुसार वागणे म्हणजे स्वातंत्र्य होय. या सर्वांमध्ये प्रा. लास्की यांची व्याख्या अधिक व्यापक आहे, त्यानुसार, "मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास ज्या वातावरणात होतो, त्या वातावरणाची जाणीवपूर्वक जपणूक करणे म्हणजे स्वातंत्र्य होय." अशा प्रकारे स्वातंत्र्य ही बंधनांचा अभाव आणि विकासासाठी पोषक वातावरण या दोहोंना एकत्र आणणारी एक समाजसापेक्ष संकल्पना आहे.

**❖ स्वातंत्र्याचे स्वरूप :**

**१. नकारात्मक स्वातंत्र्य**

नकारात्मक स्वातंत्र्य या संकल्पनेचा केंद्रबिंदू बंधनाचा पूर्ण अभाव हा आहे. याला स्वातंत्र्य संकल्पनेचा जुना आणि व्यक्तीकेंद्री दृष्टिकोन मानला जातो. नकारात्मक स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीच्या कृतींवर अनावश्यक आणि अविवेकी बंधने नसणे. या विचारसरणीनुसार, प्रत्येक व्यक्तीला एक निश्चित क्षेत्र किंवा सीमा असावी, ज्यामध्ये राज्यसंस्थेने किंवा अन्य व्यक्तीने कोणताही हस्तक्षेप करू नये. याचे सार 'कशापासून तरी मुक्त असणे' (यामध्ये आहे. व्यक्ती तिच्या स्वतःच्या इच्छेनुसार, कोणत्याही बाह्य शक्तीच्या दबावाशिवाय निर्णय घेण्यास स्वतंत्र असावी.

नकारात्मक स्वातंत्र्याच्या संकल्पनेत राज्याची भूमिका मर्यादित असते. राज्याने केवळ शांतता आणि सुव्यवस्था राखणे, करार पाळले जातील याची खात्री करणे आणि बाहेरील आक्रमणापासून व्यक्तीचे संरक्षण करणे एवढेच कार्य करावे. व्यक्तीच्या विकासाच्या मार्गातील कायदेशीर अडथळे कायदयाने नष्ट करणे, हे राज्याचे मुख्य काम असते.

**२. सकारात्मक स्वातंत्र्य**

सकारात्मक स्वातंत्र्य ही संकल्पना केवळ बंधनांच्या अभावापेक्षा अधिक व्यापक आहे. याचा केंद्रबिंदू व्यक्तीला आत्म-विकासासाठी सक्षम बनवणे हा आहे. सकारात्मक स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीच्या विकासाला संपूर्ण संधी उपलब्ध होतील असे पोषक वातावरण राज्यसंस्थेने निर्माण करणे होय. याचे सार 'काहीतरी करण्याच्या आहे. व्यक्ती केवळ बंधनांपासून मुक्त असून चालत नाही, तर तिला तिचे ध्येय साधण्यासाठी आवश्यक साधने, क्षमता आणि संधी देखील उपलब्ध असाव्या लागतात.

उदाहरणार्थ: एका गरीब व्यक्तीला शिकायचे स्वातंत्र्य आहे (नकारात्मक स्वातंत्र्य), पण फी भरण्यासाठी पैसे नसल्यास, ते स्वातंत्र्य अर्थहीन ठरते. अशा वेळी शिक्षण घेण्यासाठी संधी आणि साधने उपलब्ध करणे हे सकारात्मक स्वातंत्र्य होय.

सकारात्मक स्वातंत्र्याच्या पूर्ततेसाठी राज्यसंस्थेची भूमिका सक्रिय आणि कल्याणकारी असते. राज्याने केवळ अडथळे दूर न करता, व्यक्तीच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधांची (उदा. शिक्षण, आरोग्य, रोजगार) व्यवस्था करणे, हे सकारात्मक स्वातंत्र्यासाठी आवश्यक

ठरते. लोकमत बनवण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे, विविध प्रसारमाध्यमांचा प्रसार करणे आणि लोकांना लोकशाही प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होण्याची संधी देणे, ही सक्रिय राज्याची उदाहरणे आहेत.

**नकारात्मक आणि सकारात्मक स्वातंत्र्याची तुलना**

| वैशिष्ट्ये | नकारात्मक स्वातंत्र्य | सकारात्मक स्वातंत्र्य |
|---|---|---|
| मूलभूत गाभा | बंधनांचा अभाव | विकासासाठी संधी |
| प्रश्न | कशापासून मुक्तता? | काय करण्याची क्षमता? |
| राज्याची भूमिका | मर्यादित केवळ संरक्षक | सक्रिय कल्याणकारी आणि सुविधा देणारा |
| उदाहरणे | वृत्तपत्रस्वातंत्र्यावर कायदेशीर बंदी नसणे. | सर्वांसाठी मोफत शिक्षण आणि आरोग्य सुविधा. |
| लक्ष्य | व्यक्तीचे खाजगी क्षेत्र जपून ठेवणे. | व्यक्तीला आत्म-विकास साधण्यास सक्षम बनवणे. |

**❖ स्वातंत्र्याचे तीन प्रमुख प्रकार**

**१. नैसर्गिक स्वातंत्र्य :**

नैसर्गिक स्वातंत्र्य ही संकल्पना ऐतिहासिक आणि तात्त्विक दृष्ट्या महत्त्वाची आहे ही संकल्पना प्राचीन काळात मनुष्य जेव्हा निसर्गावस्थेत राहत होता, तेव्हा त्याला लाभलेल्या स्वातंत्र्याशी संबंधित आहे. अवस्थेत मनुष्य हा कायदे आणि नियमांच्या बंधनांपासून पूर्णपणे मुक्त होता. त्यावेळी कोणतीही राज्यसंस्था किंवा शासन अस्तित्वात नव्हते. त्यामुळे मनुष्याच्या वर्तनावर कोणतेही बाह्य बंधन नव्हते. नैसर्गिक स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीला स्वच्छंदपणे वागण्याची मुभा होती. कारण त्याला बांधणारा कोणताही कायदा नव्हता. तथापि, सामाजिक करार सिद्धांतानुसार ही निसर्गावस्था अराजक आणि असुरक्षित असल्याने, लोकांनी त्यांच्या काही नैसर्गिक हक्कांचा त्याग करून सामाजिक आणि नागरी स्वातंत्र्य स्वीकारले.

**२. राजकीय स्वातंत्र्य**

राजकीय स्वातंत्र्य हे आधुनिक लोकशाही राज्यपद्धतीचा आधारस्तंभ आहे. ते व्यक्तीला राज्याच्या कारभारात सहभागी होण्याची संधी देते. लोकांना स्वतःच्या इच्छेनुसार सरकार स्थापन करून राज्यकारभार करण्याचे स्वातंत्र्य असणे, याला राजकीय स्वातंत्र्य म्हणतात. यामध्ये नागरिक म्हणून राज्यसंस्थेचे सदस्य म्हणून जे स्वातंत्र्य मिळते, त्याचा समावेश होतो.

**राजकीय स्वातंत्र्य खालील प्रमुख हक्कांमधून व्यक्त होते.**

- मतदानाचा हक्क: निवडणुकीच्या वेळी आपला प्रतिनिधी निवडण्याचा हक्क.
- उमेदवार म्हणून उभे राहण्याचा हक्क: लोकप्रतिनिधी म्हणून निवडणुकीत भाग घेण्याचा हक्क.
- सरकारी अधिकारग्रहणाचा हक्क: योग्यता असल्यास सरकारी कार्यालयात काम करण्याचा हक्क.
- सरकारवर टीका करण्याचा व विरोध करण्याचा हक्क: शांततापूर्ण मार्गाने शासनाच्या धोरणांना पाठिंबा देणे किंवा विरोध करणे.

राजकीय स्वातंत्र्य हे लोकशाहीचे भवितव्य ठरवते, कारण नागरिकांच्या राजकीय जागरूकतेवरच लोकशाहीचा टिकाऊपणा अवलंबून असतो.

**३. राष्ट्रीय स्वातंत्र्य**

राष्ट्रीय स्वातंत्र्य ही संकल्पना देशाच्या सार्वभौमत्वाशी संबंधित आहे. जेव्हा एखादे राष्ट्र परकीय सत्तेच्या नियंत्रणाखाली असते, तेव्हा ते पारतंत्र्यात असते. हे परकीय नियंत्रण नष्ट झाल्यावर जे स्वातंत्र्य निर्माण होते, त्याला राष्ट्रीय स्वातंत्र्य म्हणतात. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या माध्यमातून त्या देशाला सार्वभौमत्व प्राप्त होते. याचा अर्थ असा की, तो देश कोणत्याही बाह्य दबावाशिवाय स्वतःचे अंतर्गत आणि परराष्ट्रीय धोरण निश्चित करण्यास सक्षम होतो.

उदाहरण: १९४७ मध्ये भारताला मिळालेले स्वातंत्र्य, हे भारतीयांचे राष्ट्रीय स्वातंत्र्य होय. यानंतर भारत एक सार्वभौम राष्ट्र बनला.

राष्ट्रीय स्वातंत्र्य हे व्यक्तिगत स्वातंत्र्यासाठी पूर्वअट (Precondition) आहे. जोपर्यंत राष्ट्राला स्वातंत्र्य मिळत नाही, तोपर्यंत नागरिकांना खऱ्या अर्थाने आणि सुरक्षितपणे नागरी किंवा राजकीय स्वातंत्र्य उपभोगता येत नाही.

### ❖ नागरिकांच्या स्वातंत्र्याच्या जोपासनेसाठी उपाययोजना :

लोकांना स्वातंत्र्याबद्दल आस्था असली पाहिजे. तसेच स्वातंत्र्याच्या जपणुकीसाठी लोक नागरिकांचे स्वातंत्र्य सुरक्षित ठेवणे, विशेषतः राज्याच्या संभाव्य आक्रमणापासून, यासाठी केवळ कायद्याची नव्हे, तर राजकीय, घटनात्मक आणि सामाजिक पातळीवरील उपाययोजनांची गरज असते.

### १. लोकजागृती आणि सावधानता

नागरिकांच्या स्वातंत्र्याचा पाया लोकजागृती हाच आहे. लोकांनी स्वातंत्र्याबद्दल आस्था बाळगली पाहिजे आणि ते जपण्यासाठी सतत जागरूक राहिले पाहिजे. कारण, 'शाश्वत जागरूकता हे व्यक्तिस्वातंत्र्याचे सोन आहे.' केवळ व्यक्तिगत स्वातंत्र्यासाठीच नव्हे, तर राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीही (राष्ट्रीय सार्वभौमत्वासाठी) सततची सावधानता हवी. राष्ट्रीय स्वातंत्र्य नसेल, तर व्यक्तिगत स्वातंत्र्य बेगडी (अर्थहीन) ठरते.

### २. लोकशाही शासन पद्धती

व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना केवळ लोकशाहीतच अर्थपूर्ण असते. हुकूमशाही किंवा निरंकुश राजवटीत नागरिकांचे स्वातंत्र्य चिरडले जाते. त्यामुळे, व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी लोकशाही शासन पद्धत टिकवून धरणे आणि बळकट करणे गरजेचे आहे.

### ३. सत्तेचे विकेंद्रीकरण

राज्याच्या आक्रमणाचा धोका टाळण्यासाठी सत्तेचे केंद्रीकरण टाळणे हा महत्त्वाचा उपाय आहे. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्यात कार्यात्मक अधिकार विभागणी करणे. यामुळे कोणतीही एक संस्था अमर्याद सत्ता वापरू शकत नाही (उदा. न्यायालये कार्यकारी मंडळाच्या मनमानी धोरणांवर नियंत्रण ठेवतात. संघ सरकार (केंद्र सरकार) आणि राज्य सरकारे यांच्या दरम्यान प्रादेशिक अधिकारविभागणी करणे. यामुळे स्थानिक पातळीवर सत्तेचे विकेंद्रीकरण होते.

### ४. लिखित आणि स्थिर राज्यघटना

व्यक्तिस्वातंत्र्य सुरक्षित राहावे म्हणून देशाच्या राज्यघटनेत स्वातंत्र्याच्या अधिकारविषयक तरतुदी समाविष्ट करणे आवश्यक आहे (उदा. मूलभूत हक्क). राज्यघटना लिखित स्वरूपात असावी

आणि ती सहजपणे व सतत बदलणारी नसावी. यामुळे शासनाला मनमानी पद्धतीने नागरिकांचे हक्क बदलता येत नाहीत.

**५. स्वतंत्र व अधिकारसंपन्न न्यायमंडळ :**

राज्यघटनेतील स्वातंत्र्यविषयक तरतुदींचे रक्षण करण्याची जबाबदारी देशाच्या न्यायमंडळावर असते. नागरिकांच्या हक्कांची पायमल्ली झाल्यास त्यांना न्यायमंडळाकडून संरक्षण मिळायला हवे. यासाठी न्यायमंडळ स्वतंत्र, निःपक्षपाती आणि अधिकारसंपन्न असणे अत्यावश्यक आहे.

**६. शासनाच्या अधिकारांवर मर्यादा**

राज्यघटनेद्वारेच शासनसंस्थेच्या अधिकारांवर मर्यादा घातली गेली पाहिजे. यामुळे शासनसंस्थेकडून नागरिकांच्या स्वातंत्र्याचा अधिक्षेप होणार नाही आणि राज्य नेहमीच कायद्याचे राज्य म्हणून कार्य करेल.

**❖ स्वातंत्र्याचे महत्त्व :**

स्वातंत्र्य कोणत्याही मानवी समाजासाठी, राष्ट्रासाठी आणि व्यक्तीसाठी अपरिहार्य आहे. त्याचे महत्त्व खालीलप्रमाणे आहे.

**१. व्यक्तीच्या विकासासाठी अपरिहार्य**

मानव जन्मतः निसर्गतः मुक्त असतो. तो जसजसा समाजात वावरतो, तसतसा तो सामाजिक रूढी, परंपरा आणि कायद्याच्या चौकटीत येतो. या चौकटीत व्यक्तीला तिचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी आणि स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी किमान स्वातंत्र्य असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्याचा लोप झाल्यास व्यक्तीचा विकास होणार नाही आणि व्यक्तीचा विकास झाला नाही तर समाजाचा विकास होणार नाही. म्हणजेच, स्वातंत्र्य हे व्यक्तिगत आणि सामाजिक प्रगतीसाठी मूलभूत आहे.

**२. हुकूमशाहीवर नियंत्रण आणि अभिव्यक्तीचे रक्षण**

जर समाजात स्वातंत्र्य दडपले गेले, तर हुकूमशाही प्रवृत्ती प्रबळ होतात आणि निरंकुश सत्ता निर्माण होते. हुकूमशाही प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विचार करण्याची आणि विचारांची अभिव्यक्ती करण्याचे स्वातंत्र्य गरजेचे आहे. हे स्वातंत्र्य लोकांना सत्ताधाऱ्यांवर टीका करण्याची आणि त्यांना जबाबदार धरण्याची संधी देते.

**३. लोकशाहीचा आधारस्तंभ**

लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी आणि तिचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी व्यक्ति स्वातंत्र्य जोपासणे अत्यंत गरजेचे आहे. राजकीय स्वातंत्र्य (उदा. मतदानाचा हक्क, निवडणुकीत उभे राहणे) आणि नागरी स्वातंत्र्य (उदा. संघटित होण्याचे स्वातंत्र्य) असल्याशिवाय लोकांना राज्याच्या कारभारात सहभागी होता येत नाही. स्वातंत्र्य हे 'लोकशाहीतील प्राणवायू' प्रमाणे आहे.

**४. राष्ट्रीय शोषणापासून मुक्ती**

परकीय देशांत वसाहती स्थापन करून, लोकांना पारतंत्र्यात टाकून वसाहतवादी देशांनी त्यांचे मोठे शोषण केले. अशी अन्यायकारक आणि शोषणाची परिस्थिती भविष्यात उद्भवू नये यासाठी राष्ट्रीय स्वातंत्र्याची जोपासना करणे अत्यंत गरजेचे आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्य हे देशाच्या सार्वभौमत्वाचे प्रतीक आहे.

**५. अन्यायाचे परिमार्जन**

लोकांवर होणाऱ्या अन्यायांचे आणि भेदभावाचे परिमार्जन करण्यासाठी नागरी स्वातंत्र्य आवश्यक आहे. नागरी स्वातंत्र्यामुळे लोकांना न्यायालयाकडे दाद मागण्याचा, संघटित होण्याचा आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचा हक्क मिळतो. या स्वातंत्र्याशिवाय अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी कोणताही कायदेशीर मार्ग शिल्लक राहत नाही.

**क)समता :**

समता' या संकल्पनेचा अर्थ अनेकदा 'समानता' किंवा सारखेपणा असा घेतला जातो परंतु राजकीय आणि सामाजिक तत्त्वज्ञानात तो अधिक न्यायपूर्ण आणि सूक्ष्म आहे. मनुष्याच्या बोटांप्रमाणे समाजातील व्यक्तींमध्ये नैसर्गिक विषमता असते जसे की बुद्धी, शारीरिक क्षमता, रंग आणि लिंग होय. हे निसर्गनिर्मित भेद अपरिहार्य आहेत आणि ते समतेच्या तत्त्वज्ञानाचे लक्ष्य नसतात. याउलट समतेचे तत्त्वज्ञान हे कृत्रिम किंवा मानवनिर्मित विषमता नष्ट करण्यावर केंद्रित आहे. उदाहरणाथ, वंश (वर्णभेद), जात, धर्म, लिंग किंवा आर्थिक स्थिती यावर आधारित श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या भेदांमुळे निर्माण होणारी विषमता ही समाजाने तयार केलेली असते आणि ती अन्यायकारक असते. अशा प्रकारे,मानवनिर्मित विषमता कमी करणे, तसेच लिंग, वंश, वर्ण आणि जन्मस्थान यांसारख्या निरर्थक आधारांवर होणारा भेदभाव नष्ट करून समाजातील सर्व व्यक्तींना समपातळीवर आणणे हेच समतेचे तत्त्वज्ञान होय. थोडक्यात समता म्हणजे प्रत्येकाला समान संधी आणि समान आदर सुनिश्चित करून, सामाजिक न्यायाचे ध्येय गाठणे.

समतेचे तत्त्वज्ञान हे मूलतः सर्व नागरिकांना एका समपातळीवर  आणण्याचे एक महत्त्वपूर्ण सामाजिक तत्त्वज्ञान आहे. समाजात अनेकदा लिंग, वंश, वर्ण, लिपी, धर्, जन्मस्थान इत्यादी निरर्थक गोष्टींच्या आधारावर भेदभाव केला जातो आणि त्यातून कृत्रिम विषमता निर्माण होते. हे तत्त्वज्ञान नेमके याच भेदांच्या भिंती नष्ट करण्याचे कार्य करते. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, व्यक्तीच्या नैसर्गिक क्षमता किंवा गुणांचा आदर करताना तिच्यावर लादलेले सामाजिक, धार्मिक किंवा वांशिक अडथळे दूर करणे. अशा प्रकारे, समतेचे तत्त्वज्ञान हे समाजातील प्रत्येक व्यक्तीला, तिच्या पार्श्वभूमीचा कोणताही विचार न करता, समान आदर आणि समान संधी उपलब्ध करून देणारे म्हणजेच सर्वांना एका सम पातळीवर आणणारे तत्त्वज्ञान आहे.

❖ **समतेचे स्वरूप :**

समता ही एक व्यापक संकल्पना आहे, जी न्यायपूर्ण राजकीय आणि सामाजिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी तीन आधारस्तंभांवर उभी आहे.

**१. समान संधी :** या पहिल्या अर्थानुसार, राज्यातील सर्व नागरिकांना त्यांच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी समान संधी उपलब्ध असणे आवश्यक आहे. जन्मावर आधारित विशेषाधिकार किंवा सामाजिक पार्श्वभूमीचा अडथळा न येता, प्रत्येकाला आपले ध्येय गाठण्यासाठी समान आणि खुली मैदाने मिळावीत. तसेच संपत्तीचे केंद्रीकरण विशिष्ट मूठभर लोकांच्या हाती राहू नये. कारण, जेव्हा आर्थिक विषमता अमर्याद वाढते, तेव्हा ती संधींमध्ये मोठा अडथळा निर्माण करते. म्हणून आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण नियंत्रित करणे अपेक्षित आहे, जेणेकरून आर्थिक विषमता संधी हिरावून घेणार नाही. उदा. सरकारी नोकरी: सरकारी नोकऱ्या आणि शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश देताना व्यक्तीचा केवळ 'नागरिक' म्हणून विचार केला जावा. धर्म, वंश, वर्ण, जात, लिंग इत्यादी निरर्थक निकषांवर कोणताही भेदभाव न करता, केवळ योग्यता आणि क्षमता यावर आधारित संधी मिळणे हे याचे उद्दिष्ट आहे.

**२. कायद्यासमोर समानता :** हा दुसरा अर्थ मुख्यत्वे नागरी आणि कायदेशीर समता प्रस्थापित करतो. सर्व नागरिक राज्याच्या कायद्यासमोर समान मानले जावेत. याचा अर्थ 'कायद्याचे राज्य' प्रस्थापित करणे होय. न्याय देताना, व्यक्तीचा दर्जा, संपत्ती, सामाजिक पार्श्वभूमी किंवा राजकीय प्रभाव यावर आधारित कोणताही भेदभाव केला जाऊ नये. व्यक्तीचा विचार केवळ राज्याचा नागरिक म्हणून झाला पाहिजे. कायदा हा सर्वोच्च असून तो कोणत्याही व्यक्तीसाठी विशेष अधिकार किंवा सूट देत नाही. श्रीमंत असो वा गरीब, उच्च पदस्थ असो वा सामान्य नागरिक, कायद्याचे उल्लंघन केल्यास सर्वांना समान कायद्याची प्रक्रिया लागू होते.

**३. समान प्रतिष्ठा आणि दर्जा :** हा तिसरा अर्थ सामाजिक समतेचा आधार आहे, जो समाजात आदर आणि सन्मान सुनिश्चित करतो. समतेच्या तत्त्वानुसार समाजातील सर्व नागरिक हे समान दर्जाचे

मानले जावेत. प्रत्येक व्यक्तीला समाजात समान प्रतिष्ठा आणि आदर मिळणे आवश्यक आहे. कोणत्याही नागरिकाचा अपमान किंवा अवमान केला जाता कामा नये. नागरिकांत श्रेष्ठ आणि कनिष्ठ असा सामाजिक भेद केला जाता कामा नये. जात, लिंग किंवा संपत्ती यांसारख्या बाह्य घटकांवर आधारित असलेली कृत्रिम उतरंड नष्ट करणे हे याचे मुख्य उद्दिष्ट आहे. प्रत्येक व्यक्तीला केवळ 'मनुष्य' म्हणून असलेल्या तिच्या मूलभूत प्रतिष्ठेची ओळख करून देणे ज्यामुळे सामाजिक न्यायाचा पाया रचला जातो.

हे तिन्ही अर्थ एकत्रितपणे समतेची व्यापक संकल्पना पूर्ण करतात: व्यक्तीला समान संधी (आर्थिक/राजकीय), कायद्याचे समान संरक्षण (नागरी) आणि समान सामाजिक आदर (सामाजिक) मिळणे.

### ❖ समतेचे प्रकार

### १. नागरी समता :

नागरी समता ही नागरिकांच्या कायदेशीर हक्कांवर आणि स्वातंत्र्यावर आधारित असते. राज्यातील सर्व नागरिकांना समान नागरी हक्क मिळतात आणि ते समान नागरी स्वातंत्र्य उपभोगतात. सर्व नागरिकांचे नियंत्रण एकाच कायद्यानुसार केले जाते. याचा अर्थ 'कायद्यासमोर समानता' हे तत्त्व इथे लागू होते. नागरिकाचा जात, धर्म, लिंग किंवा सामाजिक दर्जा कोणताही असला तरी, त्याला समान कायदेशीर वागणूक मिळते. कायद्याच्या क्षेत्रात कोणत्याही प्रकारचा भेदभाव होऊ नये आणि सर्व नागरिकांना कायद्याचे समान संरक्षण मिळावे.

### २. राजकीय समता

राजकीय समता नागरिकांना देशाच्या राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याचे समान अधिकार देते. राज्यातील सर्व नागरिकांना समान राजकीय अधिकार प्राप्त होतात. राजकीय समतामध्ये प्रत्येक प्रौढ नागरिकाला 'एक व्यक्ती, एक मत' या तत्त्वावर मतदानाचा समान अधिकार मिळतो. तसेच कोणत्याही

भेदभावाशिवाय नागरिक कायदेशीर निकष पूर्ण करून निवडणूक लढवू शकतात व नागरिकांना योग्यतेनुसार सार्वजनिक पदे आणि सरकारी अधिकार समानतेने प्राप्त करण्याचा अधिकार असतो. या अधिकाराने देशाच्या शासनामध्ये सर्व नागरिकांचा समान सहभाग सुनिश्चित करणे.

### ३. सामाजिक समता

सामाजिक समता ही मानवनिर्मित सामाजिक उतरंड आणि भेदभाव नष्ट करण्यावर लक्ष केंद्रित करते. समाजात कोणत्याही नागरिकांमध्ये त्यांच्या नैसर्गिक किंवा सामाजिक पार्श्वभूमीवर आधारित फरक केला जात नाही. तसेच यात काळा-गोरा (वंश/वर्ण), स्त्री-पुरुष (लिंग), स्पृश्य-अस्पृश्य (जात) इत्यादी आधारावर होणारा अन्यायकारक भेदभाव पूर्णपणे नाकारला जातो. यातून रूढी आणि परंपरा यांवर आधारलेली समाजातील उच्चनीचता नष्ट केली जाते. यातून प्रत्येक व्यक्तीला समाजात समान प्रतिष्ठा आणि समान दर्जा प्राप्त होणे.

### ४. नैसर्गिक समता

नैसर्गिक समता हे समतेच्या तत्त्वज्ञानाचे मूळ नैतिक आधार आहे. या तत्त्वज्ञानानुसार निसर्गतः सर्व माणसे जन्मतः समान असतात आणि त्यांच्यात मनुष्य म्हणून समान मूल्य असते. निसर्गाने त्यांना समान बनवले असल्याने समाजाने देखील त्यांना समान मानले पाहिजे आणि त्यानुसार वागणूक दिली पाहिजे. व्यक्तींमधील कृत्रिम स्वरूपाचे भेद जे समाजाने रूढ केले आहेत ते नाहीसे केले पाहिजेत. हे नैसर्गिक समतेचे तत्त्व सामाजिक आणि राजकीय समतेला नैतिक पाठिंबा देते. तसेच प्रत्येक मानवी व्यक्तीचा आदर करणे आणि जन्म, जात किंवा संपत्तीवर आधारित विशेषाधिकार नाकारणे.

### ५. आर्थिक समता :

आर्थिक समता ही आर्थिक विषमतेचे व्यवस्थापन करण्यावर भर देते. समाजात व्यक्ती शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक दृष्टींनी भिन्न असतात. त्यामुळे त्यांच्या कार्यात आणि योगदानात फरक असतो आणि त्यातून काही प्रमाणात आर्थिक विषमता निर्माण होणे स्वाभाविक आहे. तसेच सर्व

व्यक्तींना आर्थिक दृष्टीने एकाच पातळीवर आणणे (म्हणजे सर्वांकडे सारखी संपत्ती असणे) अशक्य आणि अवास्तविक आहे. समतेचे तत्त्वज्ञान सर्व माणसांना आर्थिकदृष्ट्या समान करण्याचा आग्रह धरत नाही, तर समाजात असलेली अत्यधिक आर्थिक विषमता कमी करण्यावर भर देते. यात प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आणि स्वतःला विकसित करण्यासाठी समान संधी उपलब्ध असावी आणि गरिबी व श्रीमंतीतील मोठी दरी कमी करणे.

**❖ स्वातंत्र्य आणि समता: संबंध आणि समन्वय**

स्वातंत्र्य आणि समता या लोकशाही व्यवस्थेच्या आधारभूत कल्पना असल्या तरी, त्या एकमेकांना पूरक आहेत की परस्परविरोधी याबद्दल विद्वानांमध्ये मतभेद आहेत. स्वातंत्र्य म्हणजे केवळ बंधनांचा अभाव नसून, ते मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला अनुकूल अशी परिस्थिती निर्माण करते. दुसरीकडे, समतेचे तत्त्वज्ञान हे सम पातळीचे तत्त्वज्ञान आहे जे समाजात असलेली विषमता कमी करते आणि सर्व नागरिकांना कायद्यासमोर समान लेखते, तसेच सरकारी अधिकारग्रहणाच्या बाबतीत समान संधी उपलब्ध करून देते.

ज्या विद्वानांच्या मते या कल्पना परस्परविरोधी आहेत, ते असा युक्तिवाद करतात की, जर स्वातंत्र्य म्हणजे अमर्याद बंधनाचा अभाव असेल, तर व्यक्तींना अमर्याद संपत्ती संपादन करण्याचा हक्क मिळेल. यामुळे काही व्यक्ती अधिक श्रीमंत होतील आणि बहुसंख्य लोक गरीबच राहतील, परिणामी समाजात मोठी आर्थिक विषमता निर्माण होईल. तसेच समतेनुसार बुद्धिमान आणि प्रयत्नवादी माणसाला आणि निर्बुद्ध व आळशी माणसाला एकाच पातळीवर आणल्यास, मेहनती माणसाच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येईल.

परंतु प्रा. लास्की यांच्यासह अनेक आधुनिक विचारवंतांच्या मते, स्वातंत्र्य आणि समता या कल्पना परस्परांना पूरक आहेत. त्यांच्या मते, खरे स्वातंत्र्य म्हणजे बंधनांचा अभाव नसून, ते व्यक्तिविकासासाठी आवश्यक असलेले वातावरण होय. हे वातावरण उपलब्ध होण्याच्या बाबतीत

सर्वांना समान संधी दिली पाहिजे. समाजातील काही श्रीमंत लोकांच्या अनिर्बंध स्वातंत्र्यावर मर्यादा घालून ती संधी समाजातील बहुसंख्याकांना स्वतःच्या विकासासाठी देणे, म्हणजेच स्वातंत्र्य आणि समता यांचा योग्य समन्वय साधणे होय. थोडक्यात समता ही स्वातंत्र्याची पूर्वअट आहे; कारण आर्थिक किंवा सामाजिक विषमता खूप जास्त असेल, तर केवळ कायदेशीर स्वातंत्र्य असूनही गरीब किंवा दुर्बळ व्यक्ती आपले स्वातंत्र्य प्रभावीपणे उपभोगू शकत नाही.

❖ **समतेचे महत्त्व:**

समता हे केवळ एक नैतिक तत्त्व नसून, ते शोषणमुक्त, न्यायपूर्ण आणि सुसंस्कृत समाजाचे अधिष्ठान आहे. ज्या समुदायात समता अस्तित्वात नसते, तिथे सामर्थ्यशाली व्यक्ती आणि गट दुर्बळ व्यक्तींवर आपले प्रभुत्व गाजवतात, ज्यामुळे त्यांचे अपरिमित शोषण होते आणि मानवी हक्कांचे हनन होते. याउलट, ऐतिहासिक उदाहरणे समतेचे महत्त्व सिद्ध करतात.

- १९९० पूर्वी वर्णभेदाचे धोरण अवलंबणाऱ्या दक्षिण आफ्रिकेमध्ये गौरेतर वर्णीयांवर निर्बंध लादले जात आणि त्यांना पशुतुल्य वागणूक दिली जात असे. १९९० नंतर समता प्रस्थापित झाली; वर्णभेदाचे धोरण संपुष्टात आले आणि गौरेतर वर्णीयांना त्यांचे न्याय्य हक्क प्राप्त झाले ज्यामुळे बहुसंख्य असलेल्या कृष्णवर्णीयांनी देशाची राज्यसत्ता स्वीकारली. हे दाखवते की समता राजकीय न्याय आणि सत्ता संतुलन आणते.

- १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीपूर्वी, समाजव्यवस्था विषमतेवर आधारित होती; अल्पसंख्य उमराव आणि धर्मगुरूंना विशेषाधिकार होते, तर बहुसंख्य सर्वसामान्य लोकांचे शोषण केले जात होते. राज्यक्रांतीनंतर सामाजिक विषमता नष्ट झाली आणि समतेच्या स्थापनेनंतरच सर्वसामान्य लोकांचे शोषण संपुष्टात आले.

- पूर्वी भांडवलदार वर्गाकडून कामगार वर्गाचे अपरिमित शोषण होत होते आणि त्यांची परिस्थिती हलाखीची होती. १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीनंतर आर्थिक विषमता नष्ट

करण्यात आली आणि आर्थिक समतेच्या स्थापनेनंतर त्या देशातील सर्वसामान्यांचे राहणीमान उंचावले आणि देशाने नेत्रदीपक प्रगती साधली.

- भारतीय राज्यघटनेने समतेच्या अधिकाराच्याअंतर्गत अस्पृश्यतेचे पालन ही सामाजिक विषमतेची मूलक  पद्धत नष्ट केली. यामुळे सामाजिक समता प्रस्थापित झाली आणि भारतीय समाजावरील हा कलंक संपुष्टात आला.

थोडक्यातसमता ही शोषणाला प्रतिबंध करते आणि मानवी प्रतिष्ठा सुनिश्चित करते. समताधिष्ठित समाजातच प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा विकास साध्य करण्याची समान संधी उपलब्ध होते, ज्यामुळे राष्ट्र आणि समाजाची सामूहिक प्रगती होते.

### ❖ भारतीय राज्यघटनेतील समतेचे तत्त्व

भारतीय संविधानाच्या भाग ३ (Part III) मध्ये समतेचा अधिकार स्पष्ट करण्यात आला आहे. ही कलमे सर्व नागरिकांना नागरी, राजकीय आणि सामाजिक समता प्रदान करतात.

| कलम | तत्त्व | उद्देश आणि स्पष्टीकरण |
|---|---|---|
| कलम १४ | कायद्यासमोर समानता | हे समतेच्या अधिकाराचे मूलभूत तत्त्व आहे. यानुसार, राज्य कोणत्याही व्यक्तीला कायद्यासमोर समानता किंवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही. 'कायद्यासमोर समानता' ही संकल्पना नकारात्मक आहे (म्हणजे विशेषाधिकार नसणे), तर 'कायद्याचे समान संरक्षण' ही संकल्पना सकारात्मक आहे (म्हणजे समान परिस्थितीत समान वागणूक). |
| कलम १५ | भेदभावास मनाई | धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरून कोणत्याही नागरिकाशी भेदभाव करण्यास राज्याला मनाई |

| | | |
|---|---|---|
| | | आहे. हे कलम सामाजिक विषमतेचे मूळ आधार काढून टाकते. मात्र, महिला, बालके आणि सामाजिक/शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग (उदा. SC, ST, OBC) यांच्यासाठी विशेष तरतुदी करण्याची राज्याला परवानगी आहे. |
| कलम १६ | सार्वजनिक नोकरीत समान संधी | राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावर नोकरी किंवा नियुक्तीच्या बाबतीत सर्व नागरिकांना समान संधी मिळेल. केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान किंवा अधिवास या कारणांवरून नोकरी नाकारली जाणार नाही. मागासलेल्या वर्गांना योग्य प्रतिनिधित्व देण्यासाठी आरक्षणाची तरतूद करण्याची मुभा या कलमात आहे. |
| कलम १७ | अस्पृश्यता निवारण | हे कलम अस्पृश्यता संपुष्टात आणते आणि कोणत्याही स्वरूपात तिचे आचरण करण्यास सक्त मनाई करते. अस्पृश्यता हा एक शिक्षापात्र गुन्हा आहे. हे सामाजिक समतेच्या स्थापनेसाठी सर्वात महत्त्वाचे पाऊल आहे. |
| कलम १८ | किताब रद्द करणे | राज्याला सैनिकी किंवा शैक्षणिक पदव्या वगळता, इतर कोणत्याही प्रकारचे किताब प्रदान करण्यास मनाई आहे. यामुळे समाजात कृत्रिम श्रेष्ठता किंवा विशेषाधिकार निर्माण करणाऱ्या पदव्या संपुष्टात येतात आणि सर्व नागरिकांना समान दर्जा प्राप्त होतो. |

भारतीय संविधानातील समतेचे तत्त्व हे केवळ नागरिकांच्या समान हक्कांची हमी देत नाही, तर सामाजिक आणि आर्थिक विषमता कमी करून, शोषणमुक्त समाज निर्माण करण्यावर भर देते. हे तत्त्व सामाजिक न्याय आणि लोकशाहीच्या मूल्यांना वास्तविक जीवनात उतरवण्याचे काम करते.

**ड)न्याय :**

न्याय ही संकल्पना योग्यता, नैतिकता आणि कायद्याचे अधिराज्य या आधारभूत तत्त्वांवर उभी आहे. 'न्याय' म्हणजे थोडक्यात 'प्रत्येक व्यक्तीला तिचे योग्य देणे' होय. ही संकल्पना केवळ एकाच स्वरूपाची नसून, तिचे स्वरूप व्यापक आहे आणि ती समाजाच्या विविध स्तरांवर कार्य करते. कायदेशीर न्याय हा यातील एक महत्त्वाचा भाग आहे जो न्यायालयांद्वारे कायद्याचे पालन आणि अंमलबजावणी केली जाईल याची खात्री देतो. कायदेशीर न्यायाचा उद्देश हा आहे की, कायद्याची अंमलबजावणी करताना कोणत्याही नागरिकाशी भेदभाव न करता, निष्पक्ष आणि तर्कसंगत वागणूक दिली जावी. दुसरीकडे, सामाजिक न्याय ही संकल्पना अधिक व्यापक आहे, जी केवळ कायद्यापुरती मर्यादित नसून, समाजातील वंचित आणि दुर्बळ घटकांना त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संधी मिळवून देते. सामाजिक न्यायाद्वारे या दुर्बळ घटकांवरील ऐतिहासिक अन्याय दूर करण्याचा आणि त्यांच्यासाठी समतेवर आधारित वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. याशिवाय, न्याय संकल्पनेत केवळ अधिकार देणे समाविष्ट नाही, तर न्याय आणि दंड हा पैलू देखील महत्त्वाचा आहे. यानुसार, जो व्यक्ती कायद्याचे किंवा समाजाच्या नैतिक नियमांचे उल्लंघन करतो, त्याला त्याच्या कृत्याच्या प्रमाणात योग्य दंड देणे देखील आवश्यक असते. अशा प्रकारे न्याय ही संकल्पना अधिकार आणि कर्तव्य तसेच पुरस्कार आणि दंड यांचा समन्वय साधून समाजात सुसंवाद आणि सुव्यवस्था राखते.

'न्याय' म्हणजे प्रत्येक व्यक्तीला तिचे 'योग्य होय. न्याय योग्यता नैतिकता आणि कायद्याचे अधिराज्य या तीन मुख्य स्तंभांवर आधारित आहे. सामाजिक, राजकीय आणि आर्थिक व्यवस्थेत समतोल राखणे आणि व्यक्तीचे हक्क व कर्तव्ये यांच्यात योग्य समन्वय साधणे.

❖ **न्यायाचे स्वरूप**

न्यायाचे स्वरूप केवळ एकांगी नसून, ते अनेकव्यापी आहे.

**१. कायदेशीर स्वरूप**

- **कायद्याची अंमलबजावणी:** न्याय म्हणजे न्यायालयांद्वारे कायद्याचे योग्य पालन आणि अंमलबजावणी केली जाणे. कायद्यासमोर सर्व नागरिक समान आहेत आणि त्यांच्याशी कोणताही भेदभाव न करता, निष्पक्ष वागणूक दिली जावी हे सुनिश्चित करणे.
- **दंड:** न्यायामध्ये केवळ अधिकार देणे समाविष्ट नाही, तर कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना योग्य दंड देणे देखील समाविष्ट आहे. न्यायाच्या या पैलूमुळे समाजात भीती आणि शिस्त निर्माण होते.

**२. नैतिक स्वरूप**

- **नैतिकता:** न्याय ही संकल्पना केवळ कायद्यावर आधारित नसून, नैतिक तत्त्वे आणि चांगले-वाईट यावर आधारित आहे. नैतिक न्याय योग्यता आणि सद्भावना या मूल्यांना प्रोत्साहन देतो.
- **मानवी प्रतिष्ठा:** न्याय प्रत्येक व्यक्तीच्या मानवी प्रतिष्ठेचे रक्षण करतो आणि कोणावरही अन्याय होणार नाही याची खात्री देतो.

**३. सामाजिक स्वरूप**

- **संधींची उपलब्धता:** न्यायाचे स्वरूप सामाजिक आहे. याचा अर्थ समाजातील वंचित आणि दुर्बळ घटकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संधी मिळवून देणे आणि त्यांच्यावरील ऐतिहासिक अन्याय दूर करणे होय.
- **समता :** न्याय समानता आणि समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो. जिथे नैसर्गिक किंवा सामाजिक विषमतेमुळे काही लोक मागे पडले आहेत, तिथे त्यांना समान पातळीवर आणण्यासाठी विशेष उपाययोजना करणे हे न्यायाच्या सामाजिक स्वरूपाचा भाग आहे.

थोडक्यात न्याय हा कायदेशीर नियमांनी नियंत्रित असतो, नैतिक मूल्यांनी प्रेरित असतो आणि सामाजिकदृष्ट्या समान संधी देणारा असतो.

### ❖ न्यायाचे विविध प्रकार:

न्याय ही संकल्पना एकाच वेळी कायदेशीर, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अशा विविध स्तरांवर कार्य करते आणि या सर्व संकल्पना परस्परपूरक आहेत.

**१. कायदेशीर न्याय**

कायदेशीर न्याय हा कायद्याच्या अधिराज्यावर आधारित आहे. यात दोन मुख्य पैलू समाविष्ट आहेत.

- **न्यायिक न्याय:** याचा अर्थ न्यायालयांकडून कायद्याचे योग्य स्पष्टीकरण आणि त्याची अंमलबजावणी करणे. न्यायालयाची भूमिका निष्पक्ष आणि तर्कसंगत निर्णय देऊन नागरिकांचे हक्क सुरक्षित ठेवणे ही असते.
- **विधानिक न्याय :** याचा अर्थ कायदेमंडळाने असे कायदे बनवणे जे न्यायपूर्ण आणि सर्व नागरिकांसाठी समान असतील. कायदेशीर न्याय लोकांना न्याय मिळण्याची प्रक्रिया सुनिश्चित करतो.

**२. सामाजिक न्याय :**

सामाजिक न्याय हा समाजात समानता आणि समता प्रस्थापित करण्यावर लक्ष केंद्रित करतो. या न्यायाचा उद्देश सामाजिक-आर्थिक विषमतेमुळे कोणावरही अन्याय होणार नाही याची खात्री करणे आहे. हा न्याय समाजातील दुर्बळ आणि वंचित घटकांना समान वागणूक आणि संधींचे न्यायपूर्ण वाटप मिळावे यासाठी आवश्यक आहे. थोडक्यात, सामाजिक न्यायाने कायदेशीर न्यायाला मानवी आणि नैतिक आधार मिळतो.

**३. आर्थिक न्याय**

आर्थिक न्याय हा विषमतेमुळे होणारे शोषण थांबवून सर्वांसाठी योग्य जीवनमान सुनिश्चित करतो. या न्यायामध्ये उत्पादन आणि वितरणाच्या साधनांमध्ये समानता आणणे अपेक्षित आहे. याचा मुख्य उद्देश दारिद्र्य दूर करणे, कामगारांचे शोषण थांबवणे आणि प्रत्येक नागरिकाला किमान गरजा पूर्ण करण्यासाठी योग्य आर्थिक संधी उपलब्ध करणे हा असतो. आर्थिक न्याय हा सामाजिक न्यायाला वास्तविक बनवतो कारण दारिद्र्यात असलेला माणूस स्वातंत्र्याचा किंवा इतर हक्कांचा प्रभावीपणे उपभोग घेऊ शकत नाही.

**४. राजकीय न्याय**

राजकीय न्याय हा नागरिकांना राजकीय प्रक्रियेत समान आणि सक्रिय मिळवून देतो.हा न्याय मताधिकार निवडणुकीस उभे राहण्याचा हक्क आणि सरकारी अधिकार ग्रहण करण्याचा हक्क यांसारख्या राजकीय अधिकारांमधून सुनिश्चित होतो. राजकीय न्याय सर्व नागरिकांना त्यांच्या जात, धर्म, लिंग किंवा आर्थिक स्थिती यावर आधारित कोणताही भेदभाव न करता, देशाच्या शासनप्रक्रियेत सहभागी होण्याची समान संधी देतो.

**५. वितरणात्मक न्याय**

वितरणात्मक न्याय हा सामाजिक संसाधने आणि संधींचे न्यायपूर्ण वाटप करण्यावर भर देतो. या न्यायाचे महत्त्वाचे तत्त्वज्ञान हे आहे की, गरजू लोकांना अधिक लाभ मिळावा (उदा. आरक्षण किंवा कल्याणकारी योजना). जॉन रॉल्स यांच्यासारख्या विचारवंतांच्या मते, न्याय हा दुर्बळ घटकांना त्यांच्या नैसर्गिक आणि सामाजिक अडचणींवर मात करण्यासाठी मदत करतो. हा न्याय सामाजिक आणि आर्थिक विषमतेचे व्यवस्थापन करून सर्वांसाठी समान संधी निर्माण करतो.

**❖ परस्परपूरकता आणि वास्तविक न्याय**

हे सर्व प्रकार एकात्मिक आणि परस्परपूरक आहेत. कायदेशीर न्याय हा सर्वांसाठी समान कायदा सुनिश्चित करतो, पण जर समाजात आर्थिक आणि सामाजिक विषमता असेल, तर दुर्बळ व्यक्तींना कायदेशीर न्याय मिळवण्यासाठी झगडावे लागते. म्हणून, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय

न्याय या स्वातंत्र्य, समानता आणि अधिकार या संकल्पनांना केवळ पुस्तकी नव्हे, तर वास्तविक बनवतात.

### ❖ समाजासाठी न्यायाचे महत्त्व

न्याय हा कोणत्याही सभ्य, स्थिर आणि प्रगतिशील समाजाचा मूलभूत आधारस्तंभ आहे. न्याय केवळ कायद्याचे पालन करणे नाही, तर सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्तरावर योग्यता सुनिश्चित करतो.

### १. सामाजिक सुव्यवस्था आणि स्थिरता

- **मूलभूत आवश्यकता:** न्याय समाजात सुव्यवस्था आणि स्थिरता राखतो. जेव्हा नागरिकांना त्यांच्या हक्कांचे संरक्षण होईल आणि अन्याय झाल्यास योग्य निवारण मिळेल याची खात्री असते तेव्हा ते कायद्याचे पालन करतात आणि समाजात शांतता टिकते.
- **असंतोष निवारण:** अन्याय झाल्यास व्यक्ती किंवा गट असंतोष व्यक्त करतात ज्यामुळे संघर्ष किंवा क्रांती होऊ शकते. न्याय ही भावना शमवून समाजाला विघटनापासून वाचवतो.

### २. मानवी हक्क आणि प्रतिष्ठा

- **संरक्षण:** न्याय प्रत्येक व्यक्तीच्या मूलभूत मानवी हक्कांचे संरक्षण करतो. यामध्ये जीवन, स्वातंत्र्य, मालमत्ता आणि समानतेचा हक्क समाविष्ट आहे.
- **प्रतिष्ठा:** न्यायामुळे व्यक्तीला तिची मानवी प्रतिष्ठा जपण्याचा हक्क मिळतो. कोणत्याही नागरिकाशी त्याच्या जात, धर्म, लिंग किंवा आर्थिक स्थितीमुळे भेदभाव केला जाणार नाही याची न्याय खात्री देतो.

### ३. शोषणमुक्ती आणि समानता

- **शोषणावर प्रतिबंध:** सामाजिक आणि आर्थिक न्याय दुर्बळ आणि वंचित घटकांचे शोषण होण्यापासून संरक्षण करतो. उदा. कामगार कायद्यांद्वारे श्रमाचे शोषण थांबवणे.

- **वास्तविक समता:** न्याय विशेषत: वितरणात्मक न्याय हा केवळ औपचारिक समानता पुरवत नाही, तर वास्तविक समता स्थापित करतो. वंचित घटकांना प्रगतीसाठी समान संधी मिळावी यासाठी न्याय आरक्षण यांसारख्या धोरणांना आधार देतो.

**४. व्यक्तिमत्त्व विकास आणि संधी**

- **समान संधी:** न्याय सुनिश्चित करतो की, व्यक्तीच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या संसाधनांचे आणि संधींचे वाटप निष्पक्ष होईल.
- **विकासाला अनुकूल वातावरण:** जेव्हा व्यक्तीला अन्याय आणि शोषणाची भीती नसते, तेव्हा ती निर्भीडपणे आपले व्यक्तिमत्त्व विकसित करू शकते आणि समाजाच्या प्रगतीमध्ये सक्रिय योगदान देऊ शकते.

**५. नैतिक आधार**

- **नैतिकता आणि योग्यता:** न्याय हा केवळ कायदेशीर नव्हे, तर नैतिकतेवर आधारित आहे. न्यायाची भावना समाजात योग्य आणि अयोग्य याबद्दल स्पष्टता आणते.
- **कायद्याचे अधिराज्य:** न्याय हे कायद्याचे अधिराज्य सुनिश्चित करतो, जिथे शासन व्यक्तींच्या मर्जीवर नव्हे, तर निर्धारित नियमांनुसार चालते.

थोडक्यात न्याय हा लोकशाही, स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांना वास्तविक स्वरूप देतो आणि राष्ट्राच्या सामूहिक प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे.

-----------------------------------------------------------------------------------------------

**अ) बहुपर्यायी प्रश्न**

1. अधिकारांना केवळ नैतिक स्वीकृती नव्हे, तर कायदेशीर संरक्षण मिळाल्यासच ते प्रभावी ठरतात. हे कायदेशीर संरक्षण कोणाकडून मिळते?

   अ) नागरिकांकडून

   ब) **राज्याकडून**

क) कुटुंबाकडून

ड) विरोधी पक्षाकडून

2. _____________ या विचारवंतांनी नैसर्गिक अधिकार (उदा. जीवन, स्वातंत्र्य, मालमत्ता) हे राज्याच्या स्थापनेपूर्वीपासून अस्तित्वात होते असे मानले आहे.

अ) प्रा. लास्की

ब) प्रा. डायसी

क) **जॉन लॉक**

ड) लॉर्ड ब्राइस

3. _____________ स्वातंत्र्य या संकल्पनेचा केंद्रबिंदू बंधनाचा पूर्ण अभाव हा आहे.

अ) राष्ट्रीय

ब) राजकीय

क) सकारात्मक

ड) **नकारात्मक**

4. "मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास ज्या वातावरणात होतो, त्या वातावरणाची जाणीवपूर्वक जपणूक करणे म्हणजे स्वातंत्र्य होय." ही व्याख्या कोणी दिली आहे?

अ) टी. एच. ग्रीन

ब) **प्रा. लास्की**

क) इमॅन्युएल कांट

ड) जॉन लॉक

5. **राष्ट्रीय स्वातंत्र्य** कशाचे प्रतीक आहे?

अ) व्यक्तीच्या आर्थिक प्रगतीचे

ब) **देशाच्या सार्वभौमत्वाचे**

क) न्यायपालिकेच्या अधिकाराचे

ड) शांततापूर्ण आंदोलनाचे

6. समतेच्या तत्त्वज्ञानानुसार खालीलपैकी कोणती विषमता अपरिहार्य मानली जाते, जी नष्ट करणे हे उद्दिष्ट नाही?

अ) वंश (वर्णभेद)

ब) **निसर्गनिर्मित (शारीरिक, बुद्धी)**

क) जात

ड) आर्थिक स्थितीवर आधारित

7. **कायद्यासमोर समानता** (Equality Before Law) हे तत्त्व समतेच्या कोणत्या स्वरूपाशी संबंधित आहे?

अ) सामाजिक समता

ब) आर्थिक समता

क) राजकीय समता

ड) **नागरी समता**

8. वितरणात्मक न्याय या संकल्पनेचा मुख्य उद्देश काय आहे?

अ) कायद्याची अंमलबजावणी करणे

ब) **सामाजिक संसाधने आणि संधींचे न्यायपूर्ण वाटप करणे**

क) राजकीय नेत्यांची निवड करणे

ड) नागरिकांना अमर्याद स्वातंत्र्य देणे

9. न्याय आणि दंड यातील संबंधांनुसार, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना योग्य दंड देणे हे न्यायाच्या कोणत्या स्वरूपात समाविष्ट आहे?

अ) सामाजिक स्वरूप

ब) नैतिक स्वरूप

क) **कायदेशीर स्वरूप**

ड) वितरणात्मक स्वरूप

10.भारतीय संविधानातील कोणते कलम 'अस्पृश्यता निवारण' करून सामाजिक विषमतेची मूलक पद्धत नष्ट करते?

अ) कलम १४

ब) कलम १५

क) कलम १६

ड) **कलम १७**

---

**ब) टिपा लिहा**

१. अधिकार आणि जबाबदारी यांचा सहसंबंध

२. नकारात्मक स्वातंत्र्य आणि सकारात्मक स्वातंत्र्य यातील फरक

३. समतेचे प्रकार

४. न्यायाचे प्रकार

५. स्वातंत्र्याच्या जोपासनेसाठी आवश्यक उपाययोजना

**क) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. अधिकार या संकल्पनेचा अर्थ आणि कायदेशीर स्वरूप स्पष्ट करा. तसेच राजकीय, नागरी आणि सामाजिक-आर्थिक अधिकारांमधील फरक उदाहरणांसह विशद करा.

२. स्वातंत्र्य या संकल्पनेची व्याख्या आणि स्वरूप स्पष्ट करून, नकारात्मक स्वातंत्र्य आणि सकारात्मक स्वातंत्र्य यांचे सविस्तर विवेचन करा.

३. समता या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करून, नैसर्गिक आणि मानवनिर्मित विषमतेच्या संदर्भात समतेचे महत्त्व सांगा. तसेच समान संधी आणि कायद्यासमोर समानता या दोन पैलूंचे विश्लेषण करा.

४. न्याय या संकल्पनेचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करा. तसेच कायदेशीर न्याय, सामाजिक न्याय आणि आर्थिक न्याय या तीन प्रकारांचे महत्त्व विषद करा.

५. स्वातंत्र्य आणि समता या कल्पना एकमेकांना पूरक कशा आहेत, यावर प्रा. लास्की यांच्या मताचा आधार घेऊन सविस्तर विवेचन करा आणि त्यांचे सामाजिक महत्त्व स्पष्ट करा.